# ‘बेंडाळे’मध्ये आजपासून चित्रपट निर्मिती कार्यशाळा

## डॉ. जयेंद्र लेकुरवाळे यांची पत्रकार परिषदेत माहिती

प्रतिनिधी । जळगाव

विद्यार्थ्यांना चित्रपट निर्मितीबाबतची माहिती होण्यासह त्यांच्यातील कल्पकतेला वाव मिळावा या उद्देशाने बेंडाळे महिला महाविद्यालयात बुधवारपासून दोन दिवसीय चित्रपट कार्यशाळेचे आयोजन केल्याची माहिती महाविद्यालयातील सेंटर फॉर मास मीडिया ॲण्ड फॉरेन लँग्वेजेसचे विभागप्रमुख डॉ. जयेंद्र लेकुरवाळे यांनी पत्रपरिषदेत दिली.

कार्यशाळेत चित्रपटनिर्मीतीसाठीचे बेसिक डिरेक्शन, शुटींगसह कॅमेराचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. विद्यार्थी आपल्या कल्पकतेतून स्थानिक कलावंताना घेऊन शॉट फिल्मची निर्मिती करतील. यासह कार्यशाळेस दिग्दर्शक देवेंद्र सुपेकर (मुंबई), कार्यकारी निर्माता पवन वैद्य हे विविध विषयावर मार्गदर्शन करतील असेही त्यांनी सांगितले.

### वेबसिरीजचे आव्हान : देवेंद्र सुपेकर

सध्या टेलिव्हिजनची वैचारिक पातळी घसरली आहे. पूर्वी हा प्रेक्षकवर्ग वैचारिक होता. मात्र, आता ही स्थिती बदलली आहे. ३० टक्के लोक मालिका बघतात. वेबसिरीज हे आता मालिका निर्मात्यांपुढे आव्हान बनले आहे. यामुळे मालिका, चित्रपटाच्या निर्मितीतून मातीचा गंध निर्माण झाला पाहिजे, असे चित्रपट दिग्दर्शक देवेंद्र सुपेकर यांनी सांगितले. दरम्यान, चित्रपटाचा विषय कसा निवडावा, यानंतर पटकथा, संवाद कास्टिंग या विषयी विद्यार्थांना माहिती दिली जाणार असल्याचेही कार्यकारी निर्माता पवन वैद्य म्हणाले.

---



कार्यशाळेत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना देवेंद्र सुपेकर.

# केले थेट चित्रीकरण

## कार्यशाळा : चित्रपट निर्मितीचे दिले धडे

लोकमत न्यूज नेटवर्क

जळगाव : बेंडाळे महिला महाविद्यालयात चित्रपट निर्मिती कार्यशाळेत थेट चित्रीकरणासह विद्यार्थिनींना मार्गदर्शन करण्यात आले.

महाविद्यालयातील सेंटर फॉर मास मीडिया व फॉरेन लँग्वेजेस्तर्फे दोन दिवसीय चित्रपट निर्मिती कार्यशाळेस सुरुवात झाली. या वेळी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.रामप्रकाश यांनी महाविद्यालयातील कौशल्य विकासाच्या उपक्रमांबाबत माहिती दिली. उपप्राचार्य प्रा.भालचंद्र सावखेडकर यांनीही मार्गदर्शन केले. कार्यशाळेच्या प्रथम सत्रात पवन वैद्य यांनी चित्रपट निर्मितीसाठी आवश्यक असणाऱ्या बाबीवर चर्चा केली. चित्रपट निर्मितीसाठी प्रथम उत्तम कथा आवश्यक असते. कथा ही चित्रपटाचा आत्मा असते. चित्रपट निर्मितीसाठी लहानात लहान गोष्टींचा विचार होणे आवश्यक असते, असे सांगितले. अनेक नवीन कलाकार अथवा निर्माते मोठ्या हौसेने चित्रपट तयार करतात, मात्र त्यातून उत्पन्न कसे मिळेल, लोकांपर्यंत तो चित्रपट कसा पोहचेल यात आपण मागे पडतो. यामुळे चित्रपट निर्मिती करणाऱ्यांना अनेक आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागते, असेही वैद्य यांनी सांगितले.

दुसऱ्या सत्रात दिग्दर्शक देवेंद्र सुपेकर यांनी कथा व पटकथा यातील फरक व त्या कशा असाव्यात हे सांगितले. सुपेकर यांनी पटकथा कशी लिहावी याबाबत उपस्थितांकडून प्रात्यक्षिक करवून घेतले व लघुचित्रपटासाठी पटकथेची निवड केली. चित्रपट अथवा शॉर्ट-फिल्मसाठी आवश्यक विषय तसेच योग्य लोकेशन, कथेनुसार कलाकारांची निवड कशी करावी यासाठी कार्यशाळेत आलेल्या विद्यार्थ्यांचे ऑडिशन घेण्यात आले. तसेच कथेनुसार कलाकाराची निवड कशी करावी याचे मार्गदर्शन या वेळी सुपेकर यांनी केले.

तिसऱ्या सत्रात उपस्थितांनी लघुचित्रपटाच्या प्रत्यक्ष चित्रीकरणाची सुरुवात केली. सदर कार्यशाळा ही अनुभवाधिष्ठित असणार आहे. गुरुवारी सकाळ सत्रात विविध ठिकाणी प्रात्यक्षिक चित्रीकरण, संकलन, व्हॉईस, ओव्हरचे पद्धती इ.चे प्रशिक्षण दिले जाणार आहे.

**कार्यशाळा** | चित्रपट निर्मिती कार्यशाळेत विविध निर्मात्या-दिग्दर्शकांचे मार्गदर्शन

# कथा हा आत्मा, पण चित्रपट प्रेक्षकांपर्यंत पोहोचणेही गरजेचे

## लघुपट निर्मितीच्या प्रात्यक्षिकासह प्रशिक्षण

**प्रतिनिधी। जळगाव**



चित्रपट निमिर्ती कार्यशाळेत बोलताना (इन्सेटमध्ये) देवेंद्र सुपेकर. समोर उपस्थित विद्यार्थी.

चित्रपट आणि मालिका बनवताना कथेवरच अनेक गोष्टी अवलंबून असतात. कथा ही चित्रपटाचा आत्मा असून चित्रपट निर्मितीसाठी लहानात लहान गोष्टींचा विचार होणे आवश्यक असते, असे सांगून केवळ निर्मिती करून भागत नाही तर चित्रपट प्रेक्षकांपर्यंत पोहोचणेही आवश्यक असते, असे प्रतिपादन निर्माते- दिग्दर्शक पवन वैद्य यांनी केले. या कार्यशाळेत विद्यार्थ्यांना लघुपट निर्मितीचे प्रात्यक्षिकासह प्रशिक्षणही देण्यात येत आहे.

डॉ. अण्णासाहेब जी.डी.बेंडाळे महिला महाविद्यालयातील 'सेंटर फॉर मास मीडिया व फॉरेन लॅंग्वेजेस'तर्फे दोन दिवसीय चित्रपट निर्मिती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले असून बुधवारी कार्यशाळेची सुरवात झाली. याप्रसंगी प्रथम सत्रात चित्रपट निर्मिती प्रक्रियेविषयी मार्गदर्शन करताना वैद्य बोलत होते. वैद्य यांनी चित्रपट निर्मितीसाठी निगडित आणि आवश्यक सर्वबाबींबाबत सखोल चर्चा केली. यात त्यांनी प्री -प्रॉडक्शन, पोस्ट प्रॉडक्शन काय असते, चित्रपट निर्मितीसाठी प्रथम उत्तम कथा आवश्यक असल्याचे सांगून संहितेसोबतच एकूण खर्चाचा अंदाज बांधणेही तितकेच आवश्यक असते. अनेक नवीन कलाकार, निर्माते मोठ्या हौसेने चित्रपट तयार करतात. मात्र, त्यातून उत्पन्न कसे मिळेल, तो चित्रपट लोकांपर्यंत कसा पोहचेल हा विचार अधिक करत नाही आणि यात आपण मागे पडतो. यामुळे चित्रपट निर्मिती करणाऱ्यांना अनेक आर्थिक अडचणींना समोरे जावे लागते. यासाठी चित्रपट निर्मितीपासून ते चित्रपटाचा प्रचार- प्रसार हा महत्त्वाचा टप्पा असतो,असे सांगून प्रेक्षकांपर्यंत चित्रपट कसा पोहोचवावा ? याबद्दलही वैद्य यांनी मार्गदर्शन केले.

दुसऱ्या सत्रात दिग्दर्शक देवेंद्र सुपेकर यांनी मार्गदर्शन केले. उद्घाटनप्रसंगी उपप्राचार्य डॉ. राम प्रकाश यांनी महाविद्यालयातील कौशल्य विकासाच्या उपक्रमांबाबत माहिती दिली. उपप्राचार्य प्रा.भालचंद सावखेडकर यांनी व्यक्तींसाठी कला किती आवश्यक आहे, याबाबत सांगितले. तर ज्येष्ठ साहित्यिक डॉ. सुनील माळी यांनी कादंबरी लिहिताना आवश्यक असणाऱ्या घटकांवर प्रकाशझोत टाकला. प्रास्ताविक जयेंद्र लेकुरवाळे यांनी केले.

### पटकथेविषयी माहिती

देवेंद्र सुपेकर यांनी कथा व पटकथा यातील फरक व त्या कशा असाव्यात हे सांगितले. तसेच पटकथा कशी लिहावी, याबाबत प्रात्यक्षिक मुलांकडून करून घेतले. लघुचित्रपटासाठी पटकथेची निवड केली. चित्रपट व लघुपटासाठी आवश्यक विषय तसेच योग्य ठिकाण, कथेनुसार कलाकारांची निवड कशी करावी हे सांगितले. तर प्रत्यक्ष चित्रिकरणाची सुरुवातही मुलांनी केली असून स्वतः मुलांना लघुचित्रपटाची निर्मिती करायला ते लावत आहेत.

### संकलन,व्हाइस ओव्हरचे आज प्रशिक्षण

**चित्रपट निर्मिती कार्यशाळेत उद्या गुरुवारी विद्यार्थ्यांना संकलन, व्हॉइस ओव्हरचे प्रशिक्षण दिले जाणार आहे. चित्रपट,लघुपट,माहितीपटाची निर्मिती करताना त्याचे नीटनेटके संकलन अत्यंत महत्त्वाचे समजले जाते. याबाबत विद्यार्थ्यांना अधिक माहिती दिली जाणार आहे. कार्यशाळेत लघुपट निर्मितीचे प्रात्यक्षिकासह प्रशिक्षण दिले जात आहे.**




## दुचाकीच्या धडकेत बालक जखमी

नंदुरबार : शहरातील साक्रीनाका भागात दुचाकीच्या धडकेत मुलगा जखमी झाला. या मुलावर जिल्हा रुग्णालयात उपचार पूर्ण झाल्यानंतर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कोहिनूर टॉकिज परिसरातील पाच वर्षीय बालकाला ८ रोजी एमएच ३९- आर ४६७९ या महिलास्वार दुचाकीने त्यास धडक दिली. यात समर्थ हा जखमी झाला. इंदूबाई शंकर माळी यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन दुचाकीस्वार महिलेच्याविरोधात शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. दुचाकीस्वार महिलेचा शोध सुरु आहे.

## निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर बैठक

गुढे : आगामी ग्रामपंचायत निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शांतता समितीची बैठक घेण्यात आली. भडगाव तालुक्यात चार गावात ग्रामपंचायतीची निवडणूक लागली आहे. त्यात गुढे गावात १0 वर्षापूर्वी जि.प. निकालानंतर दोन गटांमध्ये भांडणे झाली होती. त्यामुळे गुढे गाव भडगाव पोलीस ठाण्यात अति संवेदनशील म्हणून नोंद झालेली असल्याने या निवडणुकीपूर्वी डीवायएसपी अरविंद पाटील, भडगावचे पोलीस निरीक्षक धनंजय यरुळे यांनी सहकाऱ्यांसह गावातील निवडणूक लढविणाऱ्या सर्व सदस्य, सरपंच आणि पॅनल प्रमुखांसह ग्रामस्थांची शांतता सभा घेऊन मार्गदर्शन केले. विशेषत: तरुणांना भांडणाचे गंभीर परिणाम भोगावे लागतात हे समजावून सांगितले.

## सुकलेले झाड अंगावर पडल्याने बालक जखमी

पारोळा : सुकलेले झाड अंगावर पडल्याने शेख तनवीर शेख उस्मान (वय सहा वर्षे, रा.बडा मोहल्ला) हा बालक गंभीर जखमी झाला. मंगळवारी सायंकाळी साडेपाचला मिश्चिकलशा बाबा दर्ग्याजवळ ही घटना घडली. हा बालक दर्गाजवळील एका सुक्या झाडाजवळ शौचालयास बसला असता अचानक हे झाड त्याच्या अंगावर पडले. त्यात त्याच्या जांगेतील भाग फाटला व डोक्यास गंभीर दुखापत झाली. त्यास बेशुद्ध अवस्थेत तत्काळ पारोळा कुटीर रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्याच्यावर डॉ.योगेश साळुखे, डॉ.राहुल जैन यांनी उपचार करुन धुळे येथे हलविण्यात आले.

## शिक्षक पुरस्कारासाठी एकही अर्ज नाही

सोयगाव : जिल्हा शिक्षक पुरस्कारासाठी तालुक्यातील एकाही शिक्षकाने प्रस्ताव सादर केलेला नाही. जिल्हा शिक्षक पुरस्कार दरवर्षी देण्यात येतो. त्यानुसार सर्व तालुक्यातून प्राथमिक व माध्यमिक विभागातून शिक्षक अर्ज करतात. मात्र यावर्षी तालुक्यातील पुरस्काराचे दावेदार असलेल्या एकाही शिक्षकाने प्रस्ताव दाखल केलेला नाही. त्यामुळे आश्चर्य व्यक्त करण्यात येत आहे. तसेच शिक्षकांचा याबाबत असलेला निरुत्साह असण्यामागे विविध कारणे असल्याचे सांगितले जात आहे.

## डॉ.बेंडाळे महाविद्यालयात चित्रपट निर्मिती कार्यशाळा

जळगाव : डॉ.अण्णासाहेब जी.डी. बेंडाळे महिला महाविद्यालयात २७ व २८ डिसेंबर रोजी चित्रपट निर्मितीची कार्यशाळा घेण्यात येणार आहे. संहितेची निवड, दिग्दर्शन, पात्र निवड, लाईट इफेक्ट आदीबाबत मार्गदर्शन मुंबई येथील दिग्दर्शक देवेंद्र सुपेकर व कार्यकारी निर्माता पवन वैद्य करणार आहेत, अशी माहिती प्राचार्य डॉ.एस.एस. राणे व केंद्र समन्वयक प्रा.जयेंद्र लेकुरवाळे यांनी दिली.

## श्रीसंत सेवा समूहातर्फे शेगाव दिंडीचे आयोजन

भुसावळ- श्रीसंत सेवा समूहातर्फे २५ ते २८ दरम्यान भुसावळ ते शेगाव पदयात्रा पालखीचे आयोजन करण्यात आले आहे. यावर्षीचा सोहळा आळंदीचे महंत स्वामी सुभाष महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली भजनाच्या गजरात निघणार आहे. भाविकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे दशरथ सपकाळे यांनी केले आहे.

## गळफास घेऊन इसमाची आत्महत्या

धुळे : तालुक्यातील नगाव येथे राहणारे चंद्रकांत दयाराम पाटील यांनी गळफास घेऊन सोमवारी दुपारी जीवनयात्रा संपविली. त्यांना शालक दीपक भीमराव पाटील (रा. फागणे, ता. धुळे) यांनी हिरे वैद्यकीय महाविद्यालयात दुपारी दाखल केले. डॉ. मोहित मोरे यांनी तपासून मयत घोषित केले. या घटनेची माहिती हे.कॉ. आर. पी. शिंदे यांनी पश्चिम देवपूर पोलीस ठाण्यात माहिती दिली.